| | | |
|---|---|---|
| MHND100019362022 | दाखल दिनांक : | ०२.११.२०२२ |
| | नोंदणी दिनांक : | ०२.११.२०२२ |
| | निकाल दिनांक : | ०३.०८.२०२६ |
| | कालावधी : | ०३-वर्षे.०१-म.०९-दि. |

भाग - अ
(न्यायनिर्णयाचे प्रथम पान)
[ परिच्छेद क्र.४४(१) प्रकरण ६ फौजदारी नियम पुस्तीका ]

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी वर्ग, कंधार, ता.कंधार, जि. नांदेड यांचे न्यायालयात

**(पिठासीन अधिकारी के.एस.खंडारे )**

निकाल तारीख – ०३.०८.२०२६

नियमित फौजदारी खटला क्र.१८०/२०२२ — निशाणी क्र. ७३

अपराध क्रमांक १२६/२०२२
पोलीस स्टेशन, लोहा
भा.दं.वि संहिताचे कलम ३२६,३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये

| | | |
|---|---|---|
| अभियोग पक्ष | | महाराष्ट्र शासनतर्फे तपासीक अधिकारी, पोलीस स्टेशन, कंधार, ता.लोहा, जि. नांदेड |
| अभियोग पक्षातर्फे अधिवक्ता | | कु.के.एस.कुलकर्णी, सहायक सरकारी अभिवक्ता |
| आरोपी | १. | संदीप गुलाब राठोड<br>वय : २३ वर्षे धंदा : |
| | २. | विठठल कनीराम राठोड<br>वय : ६० वर्षे धंदा : |
| | ३. | जयवंत कनीराम राठोड<br>वय : ५० वर्षे धंदा : |
| | ४. | सौ.सूनिता संजय राठोड<br>वय : ३५ वर्षे धंदा :<br>सर्व रा. पांगरा तांडा, कंधार ता. कंधार जि नांदेड |
| आरोपींतर्फे अधिवक्ता | श्री.एस.एल.लुंगारे | |

भाग - ब
[ परिच्छेद क्र.४४(२) प्रकरण ६ फौजदारी नियम पुस्तीका ]

| | |
|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक | १५.०६.२०२२ |

| | |
|---|---|
| प्रथम खबर अहवाल दिनांक | १६.०६.२०२२ |
| चार्जशीट (अंतीम अहवाल) दिनांक | ०२.११.२०२२ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | ०७.०७.२०२३ |
| पुराव्यास सुरूवात झाल्याचा दिनांक | १६.०७.२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी राखुन ठेवलेली तारीख | .... |
| न्यायनिर्णय दिनांक | ०३.०८.२०२६ |
| शिक्षा पारित केल्याचा दिनांक, जर असेल तर | .... |

आरोपीचे वर्णन

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हा/आरोप | दोषी किंवा निर्दोष | शिक्षा | आरोपी बंदी असलेला कालावधी फौ.प्र.सं.क. ४२८ नुसार सूट देण्याकरीता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | संदीप गुलाब राठोड | | फौ.प्र.सं. चे कलम ४१(अ)(१) अन्वये नोटीसवर सोडले. | भा.दं.वि संहिताचे कलम ३२६,३२४,३२३, ५०४, ५०६,३४ अन्वये | | | निर्दोष |
| २. | विठठल कनीराम राठोड | | | | | | |
| ३. | जयवंत कनीराम राठोड | | | | | | |
| ४. | सौ.सूनिता संजय राठोड | | | | | | |

भाग - क

[ परिच्छेद क्र.४४(३) प्रकरण ६ फौजदारी नियम पुस्तीका ]

अभियोगपक्ष/ आरोपी / न्यायालयातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी

अ. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार -

| क्रमांक | नाव | पुराव्याचे / साक्षीदाराचे स्वरूप |
|---|---|---|
| १. | नामदेव लक्ष्मण पवार (सा.क्र.१), नि.क्र. ५२ | फिर्यादी |
| २. | कैलास नामदेव पवार (सा.क्र.२), | जखमी साक्षीदार |

| | | |
|---|---|---|
| | नि.क्र. ५३ | |
| ३. | उल्हास नामदेव पवार (सा.क्र.३),<br>नि.क्र. ५४ | जखमी साक्षीदार |

ब. आरोपीतर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार, जर असेल तर -

| क्रमांक | नाव | पुराव्याचे / साक्षीदाराचे स्वरूप |
|---|---|---|
| ब.सा.क्र.१ | .. | .. |

क. न्यायालयामार्फत तपासण्यात आलेले साक्षीदार, जर असेल तर -

| क्रमांक | नाव | पुराव्याचे / साक्षीदाराचे स्वरूप |
|---|---|---|
| को.सा.क्र.१ | निरंक | निरंक |

<u>अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयामार्फत दस्तऐवजास देण्यात आलेल्या निशाणी</u>

अ. अभियोग पक्ष -

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

ब. बचाव पक्ष -

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | ५५ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | ५६ ते ५८ | वैद्यकीय प्रमाणपत्र |

क. न्यायालयामार्फत देण्यात आलेल्या निशाणी -

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| .. | .. | .. |

ड. मुद्देमाल -

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | एम.आर क्र. ५०/२०२२ | एक दगड |

## <u>न्यायनिर्णय</u>

**(घोषीत दिनांक ०३ ऑगस्ट , २०२६)**

भारतीय दंड विधानसंहिता (थोडक्यात भा.दं.वि.) चे कलम ३२६,३२४,

३२३, ५०४, ५०६,३४ खालील गुन्हयाकरीता नियमीत संपरिक्षा घेण्यात आली.

२. अभियोग पक्षाचे कथन येणे प्रमाणे आहे की, दिनांक १५.०६.२०२३ रोजी सायंकाळी १८.०० वाजता फिर्यादी - नामदेव लक्ष्मण पवार हा घरासमोर रोडवर थांबला असता त्याच्या गावातील शेजारी असणारे आरोपींनी त्यांच्या घरासमोर येवून म्हणाले की, तूझा मेव्हणा प्रकाश सोमला जाधव याने त्याच्या प्लॉट मध्ये मूरूम का टाकला या कारणावरून शिवीगाळ केली व थापड बूक्याने मारहाण केली. साक्षीदार सोडवण्यासाठी आले असता आरोपी क्र १ ने दगडाने तोंडावर मारून जखमी केले . सूमित्रा हीस सूनिता राठोड हीने केस धरून ढकलून दिल्याने तीस मूक्कामार लागला. आरोपींनी फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी दिली आहे. त्यावेळी प्रकाश जाधव व गणेश पवार यांनी भांडण सोडवासोडव केली.

३. सदरच्या फिर्याद वरून पोलीस स्टेशन, कंधार यांनी आरोपींविरूदध अपराध क्र.१२६/२०२३ दिनांक १६.०६.२०२२ भा.दं.वि. चे कलम ३२६, ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ नुसार नोंदविला. सदर गुन्हयाचा तपासीक अधिकारी श्री. पी.वाय.साखरे यांनी केला. तपासा दरम्यान घटनास्थळ पंचनामा तयार केला, जप्ती पंचनामा तयार केला, वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले, साक्षीदारांचे बयाण नोंदविले, तपासाअंती आरोपींविरूदध भा.दं.वि. चे कलम ३२६,३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे पोलीस ठाणे प्रमूख श्री.एस.बी.तांबे यांनी दोषारोप दाखल केले.

४. दिनांक ०७.०७.२०२६ रोजी आरोपींविरूदध भा.दं.वि. चे कलम ३२६, ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे दोषारोप (निशाणी क्र.३३) निश्चीत केला. आरोपींनी गुन्हा नाकबूल केल्याने नियमीत संपरीक्षा घेण्यात आली.

५. आरोपींविरूदध कोणताही गुन्हा दर्शक पुरावा अभिलेखावर आलेला नसल्याने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता (फौ.प्र.सं.) चे कलम ३१३ अन्वये बयाण नोंदविण्यात आले नाही.

६. अभियोग पक्षाची कैफीयत आणि आरोपींच्या बचावावरून खालील मुद्दे माझे न्यायनिर्णयाकरीता उद्भवले. त्यांचे निष्कर्ष मी खालील कारणमीमांसेप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक १५.०६.२०२२ रोजी सायंकाळी १८.०० वाजताचे सुमारास, पांगरा तांडा, कंधार ता. कंधार जि. नांदेड येथे आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीच्या मूलाला दगड या प्राणघातक हत्याराने मारुन इच्छापूर्वक गंभीर दुखापत केली व त्याद्वारे कलम ३२६ सह कलम ३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा केला आहे ? | नकारार्थी. |
| २. | दिनांक १५.०६.२०२२ रोजी सायंकाळी १८.०० वाजताचे सुमारास, पांगरा तांडा, कंधार ता. कंधार जि. नांदेड येथे आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीच्या मूलाला दगडाने मारुन इच्छापूर्वक गंभीर दुखापत केली व त्याद्वारे कलम ३२४ सह कलम ३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा केला आहे ? | नकारार्थी. |
| ३. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीव त्याची पत्नीला लाथाबूक्यांनी मारुन इच्छापूर्वक दुखापत केली व त्याद्वारे कलम ३२३ सहकलम ३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा केला आहे ? | नकारार्थी. |
| ४. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी तुम्ही आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादी प्रक्षोभीत होवू शकतो हे माहित असताना त्याच्याकडुन एखादा गुन्हा घडावा किंवा सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा, याउद्देशाने शिवीगाळ करुन फिर्यादीस अपमानीत केले व त्याद्वारे कलम ५०४ सह कलम ३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा केला आहे ? | नकारार्थी. |
| ५. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी तुम्ही आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीला धाक बसावा याकरीता त्याला जीवे मारण्याची धमकी दिली व त्याच्या मनात दरारा निर्माण केला व त्याद्वारे कलम ५०६ सहकलम ३४ भा.द.वि. अन्वये गुन्हा केला आहे ? | नकारार्थी. |
| ६. | आदेश काय ? | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते. |

<u>कारणमिमांसा</u>

**७.** दिनांक १६.०७.२०२६ रोजी सदर प्रकरणातील फिर्यादी व जखमी साक्षीदार फितूर झाल्याने व अभियोग पक्षाचा निशाणी क्रमांक १ वर आदेश पारीत करुन पुरावा बंद करण्यात आला.

८. सरकारी वकील आणि आरोपींचे विद्वान वकील यांचा युक्तीवाद पुराव्या प्रमाणे ऐकला.

<u>मुद्दा क्र.१ ते ५ करीता -</u>

९. नामदेव पवार (सा.क्र.१) याने त्याच्या सरतपासात असे सांगीतले की, ते आरोपींना ओळखतात. ते त्यांचे नातेवाईक आहेत. कोणतीही घटना घडली नाही. त्यांना लिहता वाचता येत नाही. त्यांना फिर्याद व प्रथम खबरी अहवाल दाखवला. फिर्याद व छापील प्रथम खबरी अहवालवर त्याची सही आहे. त्यातील मजकुर त्याला माहित नाही.

**१०.** कैलास (सा.क्र.२) याने त्याच्या सरतपासात असे सांगीतले की, फिर्याद हे त्यांचे वडील आहेत. कोणतीही घटना घडली नाही. पोलीसांनी त्याचे बयाण घेतले नाही.

**११.** उल्हास (सा.क्र.३) याने त्याच्या सरतपासात असे सांगीतले की, तो आरोपींना ओळखतो ते त्यांच्या तांडयातील आहेत. कोणतीही घटना घडलेली नाही. त्याला कोणीही मारहान केली नाही. पोलीसांनी त्याचे बयाण घेतले नाही.

१२. नामेदव(सा.क्र.१), कैलास(सा.क्र.२) व उल्हास (सा.क्र.३) यांनी अभियोग पक्षास पुरक साक्ष दिलेली नाही. अभियोग पक्षाने त्यांना सुचक प्रश्न विचारले असता कोणताही गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर आलेला नाही. याउलट आरोपीं व फिर्यादी यांचा न्यायालयाबाहेर आपसी समझोता झाल्याचे त्यांच्या उलटतपासात अभिलेखावर आले आहे. त्यामुळे सदर साक्षीदारांनी अभियोग पक्षास पुरक साक्ष दिलेली नाही. एकंदरीत पाहता आरोपींविरूदध सबळ पुरावा अभिलेखावर आला नसल्याने आरोपींविरूदध गुन्हा सिध्द झाला नाही. त्यामुळे मुद्दा क्र. १ ते ५ चे उत्तर मी नकारार्थी देत आहे.

<u>मुद्दा क्र. ६ करीता -</u>

१३. आरोपीं यांनी कलम ४३७(अ) फौजदारी प्रकिया संहितेप्रमाणे पुर्तता अगोदरच नि.क्र ६० ते ७१ प्रमाणे केलेली आहे. जप्त मुद्देमाल एम.आर क्रमांक ५०/२०२२ एक दगड मूल्यहीन असल्याने अपील काधावधीनंतर नष्ट करणे आवश्यक आहे. मुद्दा क्र.१ ते ५ चे उत्तर नकारार्थी दिल्यामुळे आरोपीं निर्दोष सुटण्यास पात्र आहेत. त्यामुळे मुद्दा क्र.६ च्या उत्तरार्थ मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे :

<u>आ दे श</u>

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र १ ते ४ यांची भादंवि कलम ३२६, ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ मधून फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| २. | आरोपींचे व जमानतदारांचे बंधपत्र रद्द करण्यात येते. |
| ३. | जप्त मुद्देमाल एम.आर क्रमांक ५०/२०२२ एक दगड अपील काधावधीनंतर नष्ट करण्यात यावा. |
| ४. | न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात पारीत. |

KUNDLIK SUDHAKAR KHANDARE

Digitally signed by KUNDLIK SUDHAKAR KHANDARE
Date: 2026.08.03 15:16:44 +0530

**(के.एस.खंडारे)**

दिनांक : ०३.०८.२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
कंधार